दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १६ वे ● अंक ७१ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.४ जून २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## राज्यात आज कोरोनाचे २५,६१७ रुग्ण झाले बरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात आज १५ हजार २२९ नव्या करोना बाधित रुग्णांचे निदान झाले आहे. यात दिलासादायक बाब म्हणजे बरे होणाऱ्या रुग्णांची संख्या आज निदान झालेल्या रुग्णांच्या संख्येहून अधिक आहे. आज एकूण २५ हजार ६१७ इतके रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. मात्र, गेल्या काही दिवसांच्या तुलनेत मृत्यूमुखी पडलेल्या रुग्णांची संख्याही काहीशी वाढल्याचे चित्र आहे. आज दिवसभरात ३०७ करोना बाधितांचा मृत्यू झाला आहे.

आज मृत्यूत किंचित वाढ दिसत असली तरी राज्यातील मृत्यूदर १.६८ टक्के इतका आहे. याबरोबर राज्यात आज २५ हजार ६१७ रुग्ण बरे होऊन आतापर्यंत एकूण ५४ लाख ८६ हजार २०६ रुग्ण बरे झाले आहेत. यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९४.७३ टक्क्यांवर पोहोचले आहे. राज्यातील ॲक्टिव्ह रुग्णांची संख्या २ लाख ४ हजार ९७४ इतकी झाली आहे. राज्यातील सक्रिय रुग्णांचा जिल्हानिहाय विचार करता पुणे जिल्ह्यात सक्रिय रुग्णांची संख्या सर्वाधिक असली तरी ती घटत आहे. पुण्यात एकूण २६ हजार ४४३ इतके रुग्ण आहेत.

## मुरुड-कोलाड महामार्गाचे काम प्रगतीपथावर!

# रोहा शहारामधून जाणाऱ्या रस्त्याचे काम क्वीन्स नेकलेस प्रमाणे आकर्षक व दर्जेदार करा

### खा.सुनील तटकरे यांनी घेतला मुरुड-कोलाड मार्गाच्या कामाचा आढावा

**दै.रायगड नगरी । रोहा**

मुरुड कोलाड महामार्गाचे काम प्रगतीपथावर असून खा. सुनील तटकरे यांनी या रस्त्याच्या कामाची पाहणी केली, रोहा शहरातून जाणाऱ्या यामार्गाचे काम आकर्षक व दर्जेदार करा अश्या सुचना त्यांनी बांधकाम विभागाचे अभियंता व ठेकेदार यांना यावेळी दिल्या आहेत.

कोलाड –रोहा– चणेरा या मार्गाच्या रुंदीकरण व मजबुती करणाचे काम सुरु आहे. रोहा शहरातील दमखाडी ते तहसील कार्यालय या मुख्य रहदारी असलेल्या भागातून हा रस्ता जात आहे. कुंडलिका नदी पात्रालगत हा मार्ग असल्यामुळे याआधी येथे पावसाळ्यात डोंगर माथ्यावरून येणारे पाण्याचा योग्य निचरा न झाल्यामुळे रस्ता पाण्याखाली जात नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत होता. म्हाडा कॉलनी ते वरसे असा तीन किलोमीटर लांबीचा सिमेंट काँक्रीट चा रस्ता बनविण्यात येत आहे.



यासोबतच यामध्ये रस्ता दुभाजक ही टाकण्यात येणार आहे. त्यामुळे रोहा शहरातून जाणारा हा मुख्य रस्ता असून नदी संवर्धन प्रकल्पामुळे कुंडलिका पात्र आता देखणे झाले आहेत. त्याला लागुनच हा रस्ता असल्यामुळे मुंबई मरीन लाईन्स रस्त्याला जसा क्वीन्स नेकलेस म्हणून ओळखला जातो त्या प्रमाणेच शहरातून जाणाऱ्या मार्गाचे काम आकर्षक व दर्जेदार करा अश्या सुचना रायगडचे खा. सुनिल तटकरे यांनी बांधकाम विभागाचे अभियंता व ठेकेदार यांना केल्या. हे काम होत असताना रोहे अष्टमी नगरपरिषद, रोहे शहरातील सर्व स्थरातील नागरिकांचे सहकार्य आपणांस राहील त्यामुळे त्यांच्याकडून भविष्यातील कालावधीसाठी केलेल्या सुचनांचे विनंतीनुसार काम करत एक ओळख निर्माण करणारा मार्ग तयार होईल असा विश्वास खा. सुनील तटकरे यांनी याकामाचा आढाव घेताना व्यक्त केला. यावेळी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, मावळते उपनगराध्यक्ष महेश कोलाटकर, नवनिर्वाचित उपनगराध्यक्षा रिजवाना शेट्ये, शहर अध्यक्ष अमित उकडे, गटनेते महेंद्र गुजर, सभापती मयूर दिवेकर, ज्येष्ठ नगरसेवक अहमद दर्जी, समीर सकपाळ, चंद्रकांत पार्टे, बांधकाम विभागाचे उपअभियंता देवकाते, सहाय्यक अभियंता पाटील, शकॉनचे अभियंता देशमुख आदी उपस्थित होते.

गेली अनेक वर्षे नादुरुस्त अवस्थेमुळे सतत चर्चेत व वादग्रस्त असणाऱ्या कोलाड–रोहा–चणेरा मार्गाच्या रुंदीकरण व मजबुती करणाचे काम अखेर सुरु झाले. कोलाड पासून रोहा पर्यंत पहिल्या टप्यातील कामातच चांगला व रुंद रस्ता आता होत आहे. त्यासोबत चणेरा पर्यंतचा मार्गही आता नव्याने कात टाकत आहे. यातील तीन किमी अंतराचा रस्ता हा अत्याधुनिक पद्धतीने सिमेंट काँक्रीटने बनविण्यात येत आहे. यातील बहुतांशी भाग हा रोहा शहरा आणि वरसे मधून जात आहे. त्यामुळे या मुख्य मार्गाचे काम सुरु असताना ते दर्जेदार व नियोजनबद्ध व्हावे यासाठी सुचना रोह्यातील लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार व जागृत नागरिकांनी प्रशासना कडे केल्या होत्या. यादृष्टीने हे होत असलेले काम लोकाभिमुख व्हावे यासाठी रायगडचे खा. सुनिल तटकरे यांनी येथे भेट देऊन याकामाची पाहणी केली.

## संक्षिप्त...

### कोरड्या विहिरीत अडकलेल्या अश्वाची सुटका



**दै.रायगड नगरी । दिघी**

कापोली येथील विहिरीत अडकून बसलेल्या घोड्याची सुटका करण्यात आली. सकाळच्या सुमारास वीस फूट खोल विहिरीमध्ये पडलेल्या घोड्याला ग्रामस्थांनी एकत्रित येत अथक मेहनतीने सुखरूप बाहेर काढले.

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन परिसरात नुकत्याच पडलेल्या पावसामुळे सर्वत्र हिरवळ पसरली असुन, हा ओला चारा खाण्यासाठी काही गुरांचे व अश्वांचे (घोड्याचे) मालक आपली जना–वरे दिवसरात्र मोकाट सोडून देत आहेत. असाच एक घोडा भटकत असताना (ता.३) आज पहाटे कापोली येथील प्रशांत पाटील यांचे घरा शेजारील विहीरीत पडला.

सकाळी ग्रामस्थांच्या लक्षात येता, गावचे पोलीस पाटील रत्नाकर पाटील, विराज पाटील, प्रशांत पाटील, महादेव पाटील, सुरज गाणेकर, प्रकाश गाणेकर, राज पाटील तसेच येथील जगदंबा क्रीडा मंडळाचे सदस्यांनी एकत्रित येत घोड्याची सुटका करण्यास प्रयत्न सुरू केले. यामध्ये राज पाटील या तरुणाने पुढाकार घेऊन विहिरीमध्ये उतरून अतिशय शिताफीचे प्रयत्न केल्याने घोडा सुखरूप विहिरीबाहेर काढण्यात ग्रामस्थांना यश आले.

एवढ़्या खोल व कोरड्या झालेल्या विहिरीत घोडा पडला असतानादेखील घोड्याला अथक परिश्रमाने घोड्याला सुखरूप बाहेर काढले. याचे नवल परिसरातील, गावातील तरुण, ज्येष्ठ नागरिक यांना झाले. तसेच या तरुणांचे सर्व ग्रामस्थांनी कौतुक केले.

**प्राईम लोकेशनला गाळा विकणे आहे**

पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.

संपर्क : ९८२०३५५३४६

## पाबळ ग्रामपंचायतीमध्ये खोटा असेसमेंट बनवून खऱ्या मालकाची केली फसवणूक

### ग्रामसेवकावर निलंबनाच्या कारवाईची मागणी

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत पाबळ मधील एक अजब प्रकार उघडकीस आला असून या ग्राम पंचायत मधील ग्रामसेवक आणि सरपंचांनी ग्राम पंचायत हद्दीमधील जांबोशी गावातील किरण पांडुरंग काडगे यांच्या मालकीच्या दुकानाचे असेसमेंट उतारा परस्पर दुसऱ्या व्यक्तीच्या ना–वावर करण्याचा अजब प्रकार उघडकीस आला आहे. त्यामुळे या व्यक्तीची फसवणूक झाल्याने त्याने ग्रामसेवक आणि सरपंच यांच्यावर कारवाई करण्याची मागणी रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लेखी केली आहे.

पाबळ ग्रुप ग्राम पंचायत हद्दीमध्ये जांबोशी येथे राहणारे किरण काडगे यांचा दुकानाचा गाळा आहे. आणि त्याचा असेसमेंट क्रमांक १५८ असून ते वेळोवेळी ते कर सुद्धा भरत आहेत. मात्र या ग्राम पंचायतीच्या सरपंच राजेश्री जाधव आणि ग्रामसेवक टी.बी.धरणे यांनी संगनमताने ग्रामसभेत कोणताही ठराव न घेता, कोणतीही कायदेशीर प्रक्रिया पार न पाडता हा असेसमेंट क्रमांक १६७ असा बदलून सदर दुकान गाळा हा दामोदर हरिश्चंद्र शिगवण यांच्या नावे केला आहे. ही खोटी नोंद खऱ्या मालकाच्या लक्षात आल्यानंतर सरपंच व ग्रामसेवक यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी अशी तक्रार किरण कागडे यांनी रायगड जिल्हापरिषदेचे मुख्याधिकारी यांच्याकडे केली आहे, अशी माहिती तक्रारदार किरण कागडे व नरेश शिंदे यांनी गुरुवारी ( ता.३) घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

२६ मार्च २०२१ रोजीच्या ग्राम पंचायतीच्या मासिक सभेतील हा चर्चेचा विषय नसूनही या ठराव क्रमांकाची नोंद इतिवृत्तध्ये कशी आली ? तसेच दामोदर शिगवण यांना हा १६७ क्रमांकाचा खोटा असेसमेंट उतारा देऊन नमुना क्रमांक ८ नियम ३२ (१) कशी टाकली ? असा सवाल तक्रारदार किरण काडगे व नरेश शिंदे यांनी पत्रकार परिषदेत केला आहे.

याबाबत त्यांनी ग्रामविकास मंत्री अब्दुल सत्तार, आमदार महेंद्र दळवी, गट विकास अधिकारी, पेण यांच्याकडे देखील तक्रार केली असल्याचे पत्रकार परिषदेत सांगितले.

> ग्रामसेवक टी.बी.धरणे यांच्या कडून नजर चुकीने नोंद झाली असल्याचे त्यांनी आमच्याकडे मान्य केले असून या बाबत अधिक सखोल चौकशी सुरु आहे.
>
> **एम.एन.गढरी, प्रभारी गटविकास अधिकारी-पेण पंचायत समिती**

## उपमुख्यमंत्री अजित पवार रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) मा.ना.अजित पवार यांचा रायगड जिल्हा दौरा खालीलप्रमाणे–



शुक्रवार, दि.०४ जून २०२१ रोजी सकाळी ०८.०० वा. गिताबाग, रोहा येथून श्रीवर्धनकडे प्रयाण. सकाळी ९.३० वा. श्रीवर्धन येथे आगमन. सकाळी ९.३० वा. श्रीवर्धन नगरपरिषदेचा पाणी पुरवठा प्रकल्प व श्रीवर्धन बीच सुशोभिकरण भूमीपूजन सोहळा. सकाळी १०.३० वा. रायगड जिल्हयातील कोविड–१९ या रोगाच्या साथीच्या व तौक्ते चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर केलेल्या उपाययोजनांचा आढावा. स्थळ: प्रांत अधिकारी कार्यालय, श्रीवर्धन. दुपारी १२.१५ वा. श्रीवर्धन येथून मोटारीने प्रयाण गिताबाग, सुतारवाडी, ता. रोहा येथे आगमन व राखीव. दुपारी २.३० वा. सुतारवाडी रोहा येथून मोटारीने पुणेकडे प्रयाण.

## पोलादपूर शहरात राखीव पोलीसांची तुकडी आल्याने खळबळ

### चौपदरीकरणातील अडथळे दूर करण्यासाठी आल्याची भावना

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग आणि पोलादपूर महाबळेश्वर पाचगणी वाई सातारा जिल्हाहद्द बंदीसाठी पोलादपूर येथे राखीव पोलीसांची तुकडी आल्याने जनतेमध्ये खळबळ उडाली आहे. कोरोना लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर जिल्हाहद्द बंदी करण्यासाठी ही राखीव पोलीसांची कुमक पोल–ादपूरमध्ये हजर झाली असूनदेखील शहरात चौपदरीकरणातील अडथळे हटविण्याकामी पोलीसांची वाढीव कुमक पाचारण करण्यात आल्याची चर्चा होत आहे.

गेल्या आठवड्यामध्ये खा.सुनील तटकरे यांनी महाड उपविभागीय अधिकारी प्रतिमा पुदलवाड यांना चौपदरीकरणकामी भूसंपादित होऊन मोबदला देऊनही ताबा न देण्यामुळे पश्चिमेकडील सर्व्हीस रोडचे काम सुरू करण्यास अडथळा झाल्यास पोलीस फोर्स वापरण्याचे अधिकार असल्याचे सांगितले होते. अलिकडेच, कोरोना संसर्ग पार्श्वभूमीवर जिल्हाहद्द बंदी करण्यात आली असून पोलादपूर तालुक्याला सातारा व रत्नागिरी अशा दोन जिल्ह्यांच्या सीमा जोडल्या असल्याने कशेडी घाटातील ..../२

## उरण पूर्व विभागात गोदामांची पार्किंग रहदारीच्या रस्त्यावर, अपघाताचा धोका

**दै.रायगड नगरी । उरण**

उरणच्या पूर्व विभागात व्यवसायिकांनी सततच्या रहदारीच्या रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात मालाची साठवणूक करणारे गोदामे बांधली आहेत. बेकायदेशीर पणे बांधलेल्या या गोडाऊन मध्ये माल घेऊन येणारे कंटेनर ट्रेलर रस्त्यावरच उभे केले जात असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होऊन अपघात होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

जेएनपीटी बंदराच्या अनुषंगाने माल साठवून ठेवण्याच्या नावाखाली सध्या उरण–पूर्व भागातील बऱ्याचशा ग्रामपंचायत हद्दीमध्ये सध्या मोठ्या प्रमाणात लहान – मोठी गोदामे उभी केली जात आहेत. तर काही गोदामे बांधण्याची कामे सुरू आहेत. सध्या शेती करणे परवडत नसल्याने काही शेतकरी शेती करीत नाहीत.या शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीचे दरमहा काही हजारांच्या भाड्याचे आमिष



दाखवून काही भांडवलदारांनी त्यांच्या एजंट मार्फत अशा शेतकऱ्यांच्या जमिनी काही वर्षांच्या कराराने अल्पगुणवणूक करून संपादन केल्या आहेत. या जमिनी बिनशेती नसतांनाही या परिसरातील ग्रामपंचायतीने त्यांना बेकायदेशीरपणे बांधकाम परवानगी दिली आहे.अनेक कायदेशीर बाबींची पूर्तता न करता अशी गोदामे गव्हाण फाटा–चिरनेर तसेच चिरनेर–खोपटा ,कोप्रोली–सारडे या रस्त्याला लागून बांधण्यात आली आहेत. रस्ता चारपदरी असल्याने वाहने नेहमी जास्त वेगाने धावत असतात. ..../२

## नेरळ विकास प्राधिकरणकडून ८६ लाखाचा निधी ; नेरळ एसटी स्टँडचा रस्ता कामाला वेग

**दै.रायगड नगरी । कर्जत**

नेरळ भागातील ५० गावांचा एसटी प्रवास ज्या नेरळ एसटी स्थानकातून होतो. त्या एसटी स्थानकाकडे जाणारा रस्ता गेली दहा वर्षे खड्ड्यात हरवला होता. त्यात रायगड जिल्हा परिषदेच्या मालकीच्या या रस्त्याचे नूतनीकरण करण्यासाठी मोठा निधी देखील उपलब्ध नव्हता. मात्र नेरळ विकास प्राधिकरण मधून निधी प्राप्त झाल्यानंतर नेरळ एसटी स्टँड रस्त्याचे आरसीसी काँक्रीटकरण केले जात असून पुढील दहा वर्षे आता एसटी स्थानकात जाण–ारा रस्ता खराब होणार नाही असा दावा केला जात आहे.



नेरळ रेल्वे स्थानक आणि नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी जाण्यासाठी नेरळ एसटी स्थानक रस्त्याने माथेरान–नेरळ–कळंब राज्यमार्ग रस्त्याने जावे लागते. माथेरान–नेरळ–कळंब रस्त्याने गणेश स्वीट येथून ४०० मीटर अंतरावर नेरळ एसटी स्थानक आहे. हा रस्ता रायगड जिल्हा परिषदेच्या मालकीचा असल्याने आणि जिल्हा परिषदेची आर्थिक स्थिती नाजूक असल्याने मोठा निधी ..../२

## पालकमंत्री कु.आदिती तटकरे रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याच्या उद्योग आणि खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, विधी व न्याय, माहिती व जनसंपर्क, राज्यमंत्री तथा पालकमंत्री ना.कु. आदिती तटकरे यांचा जिल्हा दौरा खालीलप्रमाणे–



गुरुवार दि.०३ जून २०२१ रोजी सोईनुसार मुंबई येथून शासकीय वाहनाने सुतारवाडी ता.रोहाकडे प्रयाण. सुतारवाडी ता.रोहा येथे आगमन व राखीव. शुक्रवार, दि.०४ जून २०२१ रोजी सकाळी ०८.०० वा. सुतारवाडी ता.रोहा येथून मा.उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमवेत श्रीवर्धनकडे प्रयाण. सकाळी १०.०० वा. श्रीवर्धन येथे आगमन व मा.उपमुख्यमंत्री महोदयांसमवेत श्रीवर्धन नगरपरिषद आयोजित पाणीपुरवठा योजना व श्रीवर्धन बीच सुशोभिकरण कामाचे भूमीपूजन कार्यक्रमास उपस्थिती. सकाळी १०.३० वा. मा.उपमुख्यमंत्री महोदयांसमवेत तौक्ते चक्रीवादळ, कोविड–१९ व नगरपरिषद विकासकामांच्या आढावा बैठकीस उपस्थिती. स्थळ : उपविभागीय अधिकारी (प्रांत) कार्यालय, श्रीवर्धन. सकाळी ११.३० वा. पत्रकार परिषद, स्थळ : उपविभागीय अधिकारी (प्रांत) कार्यालय, श्रीवर्धन. दुपारी १२.०० वा. श्रीवर्धन येथून शासकीय वाहनाने सुतारवाडी ता.रोहाकडे प्रयाण. दुपारी १.३० वा. सुतारवाडी ता.रोहा येथे आगमन व राखीव.

# कोळखे येथे सरपंच मिनल रोहन म्हात्रे यांच्या पाठपुराव्याने लसीकरण केंद्र सुरु

## आमदार बाळाराम पाटील यांच्या हस्ते उदघाटन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र आजिवली मार्फत रायगड जिल्हा परिषद शाळा कोळखे मधे आज कोरोना प्रतिबंधक लसीकरण केंद्राचे उद्घाटन आमदार बाळाराम पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. ग्रामपंचायतीच्या सरपंच मिनल रोहन म्हात्रे यांच्या पाठपुराव्यापुळे हे शक्य झाले असून या नजिकच्या लसीकरण केंद्रामुळे विभागातील नागरिकांना मात्र चांगलाच दिलासा मिळाल्याने समाधान व्यक्त होत आहे. यावेळी नगरसेवक व शेकापचे पनवेल महानगर चिटणीस गणेश कडू, पंचायत समितीचे उपसभापती भरत म्हात्रे, सरपंच मिनल म्हात्रे, सदस्य रोहन म्हात्रे, सदस्य दिगंबर पाटील, सदस्य गणेश जाधव, सदस्या अपेक्षा जाधव, काँग्रेसचे पळस्पे पंचायत समिती गण अध्यक्ष भालचंद्र पाटील, माजी उपसरपंच दिनकर मुंढे, सुरेश मुंढे, पुरुषोत्तम पाटील, डॉ. संदेश गोवारी आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.



एकीकडे जगभरात कोरोना या भयंकर आजाराने थैमान घातले असताना दुसरीकडे कोरोना प्रतिबंधक लस घेतल्याने कोरोना पासून नागरिकांचा बऱ्याच अंशी बचाव होत असल्याचे आरोग्य यंत्रणेकडून सांगितले जात आहे. त्यामुळे लसीकरणाबाबत नागरिकांमध्ये गैरसमज दूर होऊन मोठ्या प्रमाणात जनजागृती होत आहे त्यामुळेच आता सर्वत्र लसीकरणाला वेग आलेल्या असताना आजिवली प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत येणाऱ्या सर्वच गावांमध्ये सुद्धा लसीकरणाला आता चांगलाच वेग येऊ लागला आहे. जसजशा प्रमाणात लस उपलब्ध होईल तसा लसीकरणाचा अजून वेग वाढेल त्यामुळेच कोरोना महामारीला निश्चितच आळा बसेल व आरोग्य यंत्रणेवरील ताण कमी होईल, असे आशादायी चित्र निर्माण होण्यास सुरुवात झालेली आहे.

यावेळी बोलताना आमदार बाळाराम पाटील म्हणाले की, लसीकरण वेगाने होणे गरजेचे असतानाच कोळखे पंचायतीने लसीकरण केंद्र सुरु करून ग्रामस्थांना दिलासा दिला आहे. जिल्ह्यात कोरोना रुग्ण वाढीचा दर कमी करण्यासाठी लसीकरण करून घेणे आवश्यक आहे. कोणत्याही अफवेला बळी न पडता ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्तीने लसीकरण करून घ्यावे. ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदारांकडे सातत्याने पाठपुरावा करून हे लसीकरण केंद्र सुरु केले आहे. कोव्हीड चे सर्व नियम पाळून याठिकाणी लसीकरण व्हावे. कोव्हीड काळात ग्रामस्थांना कोणतीही अडचण येत असल्यास रोहन म्हात्रे व सहकारी सदैव तत्पर राहतील त्यामुळे नागरिकांनी फक्त नियमांचे पालन करावे आणि ग्रामपंचायतीला सहकार्य करावे असे आवाहन यावेळी आमदार पाटील यांनी शेवटी केले.

कोळखे ग्रामस्थांच्या सोयीसाठी कोळखे ग्रामपंचायतीचे सरपंच मीनल म्हात्रे व सदस्य हे या कोविड कालावधीत ग्रामस्थांना कोरोना लस घेणे सोयीचे व्हावे याकरिता कोळखे येथे लसीकरण केंद्र मिळावे यासाठी प्रयत्नशील होते. सदर केंद्रावर सध्याच्या शासनाच्या नियमानुसार ४५ वर्षावरील नागरींकांचे लसीकरण सुरू झाले आहे. पुढील लसीकरणाचे वेळापत्रक लसीच्या उपलब्धतेनुसार जाहीर करण्यात येईल, असे सरपंच मिनल रोहन म्हात्रे यांनी म्हटले आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना खाजगी दवाखान्यात महागडे उपचार घेताना नागरिकांच्या खिशाला कात्री लागते. त्यामुळे कोळखे येथे याआधीच उपकेंद्र सुरु करणे आवश्यक होते . पनवेल तालुक्यात वाढते कोरोना रुग्ण लक्षात घेता लसीकरण केंद्र वाढवणे गरजेचे होते. जिल्ह्यात तसेच पनवेल तालुक्यात दिवसेंदिवस कोरोना रुग्णांची संख्या वाढत असताना सगळीकडे भितीचे वातावरण निर्माण झाले होते.दरम्यान कोळखे पंचायतीच्या सरपंच मीनल रोहन म्हात्रे यांच्या प्रयत्नामुळे कोळखे येथे कोरोना प्रतिबंधक लसीकरणाला सुरुवात झाली असुन पहिल्याच दिवशी ५० जणांना कोरोना लस देण्यात आली असुन सकाळी ९ ते ५ या वेळेत लस उपलब्ध असणार आहे. तसेच कोरोनाची लस घेतलेल्यांनी नियमीत तोंडाला मास्क, नियमित सॅनिटायझरने हात धुणे,सोशल डिस्टसिंगचे पालन करणे,तसचे लस घेतल्यानंतर काही त्रास जाणवल्यास जवळील प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधण्याचे आवाहन डॉक्टर संदेश गोवारी यांनी केले आहे.

# सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याणमंत्री राजेश टोपे यांचा रायगड जिल्हा दौरा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याणमंत्री राजेश टोपे यांचा रायगड जिल्हा दौरा खालीलप्रमाणे-



शुक्रवार, दि.०४ जून २०२१ रोजी सकाळी ०६.०० वा. जेतवन शासकीय निवासस्थान, मुंबई येथून श्रीवर्धनकडे प्रयाण. सकाळी १०.१५ वा. श्रीवर्धन येथे आगमन व राखीव. सकाळी १०.३० वा. मा.उपमुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली कोविड-१९ विषाणू प्रादूर्भाव व तौक्ते चक्रीवादळाच्या संदर्भात केलेल्या उपाययोजनांचा आढावा बैठक. स्थळ: प्रांत अधिकारी कार्यालय, श्रीवर्धन. दुपारी १२.०० वा. शासकीय वाहनाने श्रीवर्धन येथून गिताबाग, सुतारवाडी, ता. रोहाकडे प्रयाण. दुपारी १.४५ वा. गिताबाग सुतारवाडी येथे आगमन व राखीव. दुपारी २.३० वा. सुतारवाडी रोहा येथून मोटारीने पुणेकडे प्रयाण.

# उरण तहसिलच्या वतीने चिरनेर येथे कोरोना विषयक जनजागृती

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील चिरनेर गाव कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे मायक्रो कंटेमेंट झोन म्हणून घोषित करण्यात आले आहे.

त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालायाच्या आदेशान्वये उरण तहसिलदार कार्यालयाच्या वतीने चिरनेर येथे संपूर्ण ग्रामपंचायतीचे हद्दीत कोरोना संसर्ग टाळण्यासाठी घेण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी नागरी संरक्षण दलाचे विलास पाटील, संजय नांदगावकर, नथुराम कातकरी यांनी माईपद्वारे प्रबोधनपर प्रात्यक्षिक केले.

# पालीत मोकाट गुरांचा सुळसुळाट ; पालीकर हैराण



**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यातील पाली नगरपंचायत हद्दीतील देऊळवाडी , बाजारपेठ, आणि हटाळेश्वर चौक. विभागात मोकाट जनावरांचा उच्छाद वाढल्याने नागरिक हैराण झाले आहे. याबाबत पालीतील ग्रामस्थांनी मागणी केली आहे कि मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्यात यावी.रात्रीच्या वेळेस ते रस्त्याच्या मधोमध बसले असल्याने अपघात अपघात हि झाले आहे. या मोकाट गुरांचा कायमसुरूपी उपाययोजना करावी अशी मागाणी पालीती ग्रामस्थ करत आहेत

पावसाळा सुरू झाला आहे. गणपती मंदीर ,हटाळेश्वर चौक मुख्य बाजारपेठ, महाकाळी मंदिर परिसरआणि पालीसह संपुर्ण सुधागड तालुक्यात रस्त्यावर दिवस रात्र मोकाट गुरे ठाण मांडून असतात. जनावरांचे मालक व नगरपंचायत प्रशासनाचे याकडे लक्ष नसल्याचे दिसुन येत आहे.पाली परिसरातील रस्त्यांवर जनावरांची संख्या वाढली आहे. जनावरे भाकड झाल्यानंतर त्यांना रस्त्यावर सोडून देण्यात येते. अशीच ही सोडलेली जनावरे रस्त्यात कळपाने असल्याचे पहायला मिळत आहे. त्यात गुरांच्या झुंजी होताना दिसतात. मोकाट गुरांच्या वावरामुळे गल्लीबोळीत,रस्त्यावर शेणाचे साम्राज्य पसरल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. नगरपंचायत प्रशासनाने मोकाट गुरांना कोंडवाड्याचा रस्ता दाखवून ग्रामस्थांना त्रासातून मुक्त करावे. अशी निवेदना द्वारे मागणी सुधागड-पाली तहसिलदार तथा पाली नगरपंचायत प्रशासक दिलीप रायण्णावार यांच्याकडे करण्यात आली आहे. पालीतील मोकाट गुरांचा उपाययोजना व्हावी अशी मागणी होत आहे.

# सावळे ग्रामपंचायतीमध्ये कोरोनाबाबत जनजागृतीसाठी विविध उपक्रम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

देशात आणि राज्यात गेल्या दिड वर्षापासून कोरोनाने हाहांकार माजविला आहे. लाखो लोकांना कोरोनाने आपल्या विळख्यात ओढले. यामध्ये कितीतरी लोकांना आपले प्राण गमवावे लागले. पनवेल तालुक्यातील शहरी आणि ग्रामीण भागात देखील कोरोना मोठ्या प्रमाणात पसरला. परंतु आमचे गाव आमची जबाबदारी मोहिमेंतर्गत पनवेल तालुक्यातील सावळे ग्रामपंचायतीने कोरोनामुक्तीकडे वाटचाल करून नागरिकांमध्ये विविध उपक्रमाद्वारे जनजागृती करण्याचे काम सुरू आहे.

या मोहिमेंतर्गत ग्रामपंचायत हद्दीत कोरोनाबाबत उत्तम प्रकारे नियोजन करून संपूर्ण गाव परिसरामध्ये सोडीयम हायपोक्लोराईड तसेच सॅनिटायझरची फवारणी करण्यात येते. त्याचप्रमाणे गावातील नागरिकांना मास्क, सॅनिटायझर यांचे वाटप करून त्यांचा योग्य प्रकारे वापर करण्याच्या सूचना ग्रामस्थांना देण्यात येतात. तसेच वेळोवेळी कोव्हीड १९ बाबत सावधान राहून दक्षता घेण्याबाबत ग्रामपंचायतीतर्फे मार्गदर्शन करण्यात येते. तसेच वेळोवेळी हात धुणे, मास्कचा वापर करणे याबाबत नागरिकांना सूचना देवून जनजागृती करण्यात येते. यामध्ये सावळे ग्रामपंचायत सरपंच प्रशांत नरेश माळी यांच्यासह उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामसेवक सतीश देवकाते यांचे कोरोना मुक्तीसाठी गावकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी महत्वाची भूमिका बजावित असतात.

# समाजसेवक सुहास महागावकर आणि शांताराम घोले यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णांना फळ व मास्कचे वाटप




**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुका यादव युवक संघटना संस्थापक अध्यक्ष, निसर्गमित्र, घुम गावाचे सुपुत्र, समाजसेवक सुहास महागावकर आणि महाराष्ट्र यादव चॅरिटी ट्रस्ट मुंबईचे विश्वस्त, वाडांबा गावाचे सुपुत्र, समाजसेवक शांताराम घोले यांचा संयुक्तिक वाढदिवसाच्या निमित्ताने म्हसळा ग्रामीण रुग्णालयात समाज मान्यवरांच्या हस्ते रुग्णांना फळे आणि कोरोना प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणुन मास्कचे वाटप करण्यात आले.

याच कार्यक्रमात ग्रामीण रुग्णालयातील आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यानी कोरोना प्रादुर्भाव कालावधीत रुग्णांना चांगली सेवा देऊन कोरोना योध्दा म्हणुन काम केल्याने वैद्यकीय अधिकारी डॉ.महेश मेहता, डॉ. किरण कराड, डॉ.सोनाली करंबे, डॉ. मुनिफ लोखंडे, परिचारिका समीक्षा, पुष्पा वारसे, प्रेरणा कदम, सुनिता लेंडे, ममता मोरे, रुपेश कांबळे, श्रीमती जंगम यांचा यथोचित सन्मान करून गौरविण्यात आले. म्हसळा ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.महेश मेहता आणि माजी उपसभापती रविंद्र लाड यांनी कार्यक्रमाचे नीटनेटके आयोजन केले होते. छोटेखानी आयोजित कार्यक्रमाला माजी उपसभापती मधुकर गायकर, माजी उप सभापती रविंद्र लाड, महाराष्ट्र यादव चॅरिटी ट्रस्टचे माजी अध्यक्ष गणेश वाजे, माजी नगराध्यक्ष दिलीप कांबळे, बीजेपी मुंबई उपविभागीय उपाध्यक्ष मदन वाजे, नेवरूळ उपसरपंच सुनिल दिवेकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## पोलादपूर शहरात राखीव पोलीसांची तुकडी आल्याने खळबळ

जिल्हाहद्द तपासणी नाका कातळी बंगला येथे तसेच आंबेनळी घाटातील जिल्हाहद्द तपासणी नाका प्रतापगड फाट्याजवळील वाडा कुंभरोशी येथे आहे. यामुळे येथे कोरोना संसर्ग पार्श्वभूमीवर कडक उपाययोजना म्हणून जिल्हा पोलीसांचे राखीव दंगलनियंत्रक पथक दोन शिफ्टमध्ये या ठिकाणी गस्त व तपासणी करणार आहे. १५ जूननंतर यामध्ये अनलॉक प्रक्रिया टप्प्या-टप्प्याने होणार असली तरी रत्नागिरी आणि सातारा जिल्ह्यात तिसऱ्या टप्प्यात अनलॉकप्रक्रिया असून चौथ्या टप्प्यात रायगड जिल्ह्याचा समावेश असल्याने रायगडमधून रत्नागिरी व सातारा जिल्ह्यामध्ये प्रवेशबंदी करण्यासाठी या राखीव पोलीसांचा उपयोग महत्वपूर्ण होणार आहे.

पोलादपूर पोलीस ठाण्यात राखीव जिल्हा पोलीसांच्या दंगलनियंत्रक पथकातील ३४ कर्मचाऱ्यांची उपस्थिती असून रत्नागिरी व सातारा जिल्हाहद्द तपासणी नाक्यांवर या पोलीसांना तैनात करण्यात येणार आहे. या पथकाचा पोलादपूर शहरातील पश्चिम बाजूच्या सर्व्हिस रोडवरील अडथळा दूर करण्याच्या कारवाईशी कोणताही संबंध नसून अशा प्रकारची कोणतीही कारवाई नजिकच्या काळात प्रशासनाच्या आदेशाखेरिज होणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

## बेकायदेशीर गोदामांची पार्किंग रहदारीच्या रस्त्यावर, अपघाताचा धोका

मात्र हे गोदाम मालक त्यांच्या गोदामामध्ये पार्किंगसाठी जागा नसल्याने माल वाहतूक करणारी वाहने या रहदारीच्या रस्त्यावर उभी करीत आहेत.

गोदामामधून कोणतीही दक्षता न घेता बाहेर रस्त्यावर काढतात. त्यामुळे रस्त्यावरून जाणाऱ्या अन्य वाहनांशी जोरदार टक्कर होऊन मोठा अपघात होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. नियमानुसार गोदाम उभे करतांना वाहने पार्किंगची व्यवस्था ही गोदाम मालकाने ठेवणे बंधनकारक असूनही हे गोदाम मालक सर्वच जागेत बांधकाम करून घेत आहेत. त्यामुळे माल घेऊन येणारी वाहने ही सार्वजनिक बांधकाम खात्याच्या रस्त्यावरच उभी केली जात आहेत. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम खाते आणि वाहतूक पोलिस याकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करतात की काय असा ही प्रश्न उपस्थित होत आहे.

तसेच बिनशेती नसतांनाही अशा अनेक बेकायदेशीर गोदामांना ग्रामपंचायतने दिलेले बांधकाम परवाने कायदेशीर आहेत का याची तहसिलदार आणि जिल्हाधिकारी कार्यालयाने तपासून ही अपघाताची ठिकाणे बनणाऱ्या गोदाम कारवाई करण्याची मागणी जनतेतून होत आहे.

## नेरळ एसटी स्टँडचा रस्ता कामाला वेग

जिल्हा परिषद कडून कधीही मिळाला नाही. त्यामुळे नेरळ एसटी स्थानकातून प्रवाशाना रिक्षाने सेवा देणाऱ्या जय मल्हार रिक्षा वाहतूक संघटनेकडून दरवर्षी स्वतः पैसे काढून खड्डे भरत आली आहे. तर सामाजिक कार्यकर्ते विजय हजारे यांनी रिक्षा संघटनेचे अध्यक्षपद घेतक्यानंतर दरवर्षी पावसाळ्यात खडीच्या साहाय्याने रस्त्याची दुरुस्ती सुरू ठेवली होती. तर हजारे यांनी रिक्षा संघटनेच्या माध्यमातून तब्बल दोनवेळा उपोषण देखील केले होते. त्यावेळी रायगड जिल्हा परिषदेने नेरळ ममदापुर संकुल प्राधिकरण मधून रस्त्याचे काम करण्यात येईल असे पत्र उपोषणकर्त्यांना दिले होते. रायगड जिल्हा परिषदेच्या नेरळ विकास प्राधिकरण मधून जानेवारी २०२१ मध्ये त्या रस्त्याचे आरसीसी काँक्रीटकरण करण्यासाठी तब्बल ८६ लाखाचा निधी मंजूर केला होता. नेरळ विकास प्राधिकरणच्या निधीमधून रस्त्याचे आरसीसी काँक्रीटकरण सुरू असून रस्त्याचे काम करण्यासाठी एसटी स्टँड रस्ता पूर्णपणे बंद करण्यात आला आहे. त्यात लॉकडाऊनमुळे बंद असलेली एसटी सेवा याचा फायदा देखील रस्त्याचे काम करताना होत आहे.रस्त्यावर खडीकरण करून नंतर रोलिंग आणि आता काँक्रीटकरण सुरू आहे.त्यात पावसाने हजेरी लावण्यास सुरुवात केली असल्याने सिमेंट काँक्रीटचे काम आणखी मजबूत आणि दर्जेदार होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.त्यामुळे भविष्यात नेहमी खराब होणारा रस्ता पुढील १० वर्षे टिकाऊ बनेल असे स्थानिक बोलत आहेत.

# रोटरी क्लब मुंबई कोस्टलाईन तर्फे वावळोली कोवीड केअर सेंटरला औषधांचे मोफत वाटप

**दै.रायगड नगरी । पाली/वाघोशी**

वावळोली कोवीड केअर सेंटरला रोटरी क्लब मुंबई कोस्टलाईन तर्फे बुधवारी (ता.२) तब्बल एक लाख २० हजार रुपये किंमतीच्या औषधांचे मोफत वाटप करण्यात आले.

पाली-सुधागड तहसीलदार दिलीप रायन्नावार यांनी कोविड केअर सेंटरला लागणारी औषधे पुरविण्याची मागणी रोटरी क्लबचे माजी जिल्हा राज्यपाल व सल्लागार राहुल टिंबाडीया यांच्याकडे केली होती. या मागणीचा गांभीर्याने विचार करून राहुल टिंबाडिया यांनी तातडीने वावळोली कोविड केअर सेंटरला एक लाख २० हजारांची औषधे दिली आहेत. रोटरी क्लब मुंबई कोस्टलाईन चे प्रेसिडेंट विशाल जैन व दिग्दर्शक




अलमित्रा टिंबाडीया यांच्या माध्यमातून संपूर्ण देशभरात समाज उपयोगी कार्य करीत असतात. सुधागड तालुक्यात त्यानी केलेल्या

या महत्वपूर्ण योगदानाबद्दल राहुल टिंबाडिया यांचे तहसीलदार दिलीप रायण्णावार, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शशिकांत मढवी, डॉ. नंदकुमार मुळे यांनी आभार मानले आहेत. औषध वाटप करतेवेळी रोटरी क्लबचे सल्लागार राहूल टिंबाडीया, दिलीप रायण्णावार, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शशिकांत मढवी, सरपंच शरद चोरगे, इतर डॉक्टर व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

# कोरोना पार्श्वभूमीवर बोर्ली मंडळ सजाची साळावमध्ये बैठक

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

कोरोना रोगाच्या पार्श्वभूमीवर दुसऱ्या लाटेची शक्यता लक्षात घेऊन शासनाने निर्बंध लागू करण्यात आले असून लॉकडाऊन पंधरा जून पर्यंत करण्यात आला आहे.मुरुड तालुक्यात रुग्ण संख्या वाढत असल्याने कोर्लई निडी गाव प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले असून उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे व तहसीलदार गमन गावित यांच्या विशेष उपस्थितीत साळावमध्ये बोर्ली मंडळ सजाची बैठक घेण्यात येऊन रुग्ण संख्या आटोक्यात आणण्यासाठी कोरोना हद्दपार करण्यासाठी उपाययोजना जनजागृती करण्यात आली.

साळाव येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात नुकत्याच झालेल्या बैठकीत बोर्ली मंडळ सजातील बोर्ली, मांडला, भोईघर, साळाव, वळके व तळेखार ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक, मंडळ अधिकारी महेश निकम, तलाठी, आशासेविका उपस्थित होत्या. बोर्ली मंडळ सजातील कोर्लई निडी गावात रुग्ण संख्या वाढत असल्याने गाव प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे. अशी परिस्थिती अन्य गावात होऊ नये यासाठी उपाययोजना व सविस्तर माहिती देण्यात येऊन जनजागृती करण्यात आली. साळाव जे.एस.डब्ल्यू.हॉस्पिटल येथे कोरोना सेंटरची व्यवस्था करण्यात आली असून याचा लाभ घ्यावा. तालुक्यात रुग्ण संख्या आटोक्यात आणण्यासाठी कोरोना हद्दपार करण्यासाठी जनतेने सहकार्य करण्याचे आवाहन उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे व तहसीलदार गमन गावित यांनी केले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## पोलादपूर शहरातील मोटारसायकल चोरीबाबत पोलीस तपास वेगाने सुरु

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

शहरातील सिध्देश्वरआळीतील एका घरासमोरील मोटारसायकलची शिताफीने चोरी करून वाहनासह पसार झालेल्या चोरांचा तपास पोलादपूर पोलीस घेत असून लवकरच ही चोरी उघडकीस येण्याची खात्री पोलीसांनी व्यक्त केली आहे.

पोलादपूर शहरातील शिवसेना उपशहरप्रमुख नितीन सुरेश भोसले यांनी त्यांची मोटारसायकल दि. २६ मे रोजी घरासमोरील रस्त्यावर नेहमीप्रमाणे उभी करून ठेवली असताना मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली. याबाबत पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये रितसर तक्रार करण्यात आली असून पोलीस तपास वेगाने सुरू झाला आहे.

पोलादपूर शहरातील युनियन बँकेच्या गल्लीतून दोन व्यक्ती बाजारपेठेच्या रस्त्यावर येऊन संशयास्पदरित्या वावरताना काही व्यापाऱ्यांच्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसून येत असून त्यांच्याकडून या मोटारसायकलची चोरी झाल्याची शक्यता नागरिकांकडून वर्तविली जात आहे. या घटनेला एक आठवडा उलटूनदेखील अद्याप पोलीस तपास न लागल्याने नागरिकांकडून तपासाबाबत उत्कंठा व्यक्त होत असून पोलीसांकडून वाहनासोबत चोरही पकडण्यात येतील, अशी खात्री व्यक्त केली जात आहे.

## उरणमध्ये खासगी लसीकरणाला सुरुवात

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

उरण(घन:श्याम कडू) कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावाला आळा घालण्यासाठी शासनाने लसीकरणाची मोहीम राबविण्यास सुरुवात केली आहे.

त्यावर गर्दी होत असल्याने उरणमध्ये खासगी लसीकरणास जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी परवानगी दिली आहे. उरणमधील पालवी हॉस्पिटल, मोरे हॉस्पिटल व ठाकरे हॉस्पिटल अशा ३ हॉस्पिटलला परवानगी देण्यात आली आहे.

काल पासून या लसीकरणास सुरुवात झाली आहे. उरण मेडिकल वेल्फेअर असोसिएशनच्या मदतीने ही लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. काल एकूण ६५० जणांनी लसीकरण करून घेतले. लवकरच या तिन्ही ठिकाणी लसीकरणास सुरुवात होणार आहे.

तरी ज्यांना कोणाला लसीकरण करावयाचे असेल त्यांनी पालवी हॉस्पिटल ९८९२५१५५११, मोरे हॉस्पिटल ९८२१३१८५२३ व ठाकरे हॉस्पिटल ९८३३४५४१९८ या ठिकाणी संपर्क करून नोंदणी करून घेण्याचे आवाहन वरील हॉस्पिटलने केले आहे.

# राज्यातील विद्यार्थ्यांच्या अनेक प्रलंबित समस्यांबाबत राज्यपाल यांची घेतली भाजप युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी भेट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्यातील विद्यार्थ्यांच्या अनेक प्रलंबित समस्या या विषयी भारतीय जनता युवा मोर्चाच्या प्रतिनिधी मंडळाने महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांची भेट घेवून त्यांच्याशी चर्चा केली.



११ वी प्रवेश प्रक्रियेसाठीची मूल्यांकन पद्धती, १२ परीक्षा बाबत ची अस्पष्ट भूमिका, परीक्षा शुल्क माफी, शाळा महाविद्यालये फी मध्ये सूट अश्या काही महत्त्वपूर्ण विषयावर यावेळी महामहीम राज्यपाल महोदयांशी चर्चा करण्यात आली व याप्रसंगी राज्य सरकारकडून सदर विषयांमध्ये अपेक्षित कार्यवाही संदर्भात काही मागण्या करण्यात आल्या. त्यामध्ये या एसएससी बोर्ड परीक्षेसाठी अंदाजे १७ लाख विद्यार्थी बसणार होते आणि त्यांच्याकडून प्रत्येकी अंदाजे रु.४१५/- इतके परीक्षा शुल्क आकारण्यात आले आहे.या माध्यमातून एकत्रितपणे अंदाजे ६८ करोड़ पेक्षा जास्त रक्कम राज्य सरकार कड़े परीक्षा शुल्कापोटी जमा झाली आहे. जर सरकार परीक्षा घेणार नाही तर विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क का परत केले जात नाही,? विद्यार्थ्यांच्या या पैशामध्ये तरी सरकारने पारदर्शकता ठेवावी व सदर परीक्षा शुल्क विद्यार्थ्यांना त्वरीत परत करावे! १०वी एसएससी परीक्षा रद्द केल्यावर आता ११वी ची प्रवेश प्रक्रीया कोणत्या निकषांच्या आधारे केली जाणार आहे या बाबतचे धोरण अजूनही राज्यसरकारने स्पष्टपणे जाहीर केलेले नाही, त्यामुळे विद्यार्थी व पालक यांच्या मनात प्रचंड संभ्रमाचे वातावरण आहे. सदर विषयात सरकारने आता वेळ दवडता भूमीका त्वरीत स्पष्ट करावी.

महाराष्ट्रातील सर्वच विद्यालये आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचें परीक्षा शुक्ल विद्यापीठांकडून विनाशर्त माफ करण्यात यावे. सध्या महाविद्यालयात साधारण २० वेग-वेगळे प्रकारचे शुल्क आकारले जात आहेत, परंतु महाविद्यालयातील वाचनालय, प्रॅक्टिकल लॅब, कम्प्युटर लॅब, वास्तू, मैदान, वर्गखोल्या, या सर्वासाठी लागणारी वीज या सर्व गोष्टींचा वापर होत नसल्याने शाळा/ महाविद्यालयांनी केवळ ट्युशन फी आकारावी आणि अन्य सर्व प्रकारचे शुल्क माफ करावे! असे आदेश महाराष्ट्र सरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने द्यावेत. जे विद्यार्थी कोविड-१९ मुळे थेट प्रभावित झालेले आहेत, त्यांची फी महाविद्यालयातर्फे माफ करण्यात यावी, अथवा सरकारने हस्त-क्षेप करून त्या विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य करून त्यांची फी भरावी. फी भरण्याची स्थीती असलेल्या विद्यार्थ्यांना फी टप्प्या टप्प्याने भरण्याचीं सुविधा द्यावी.

महाराष्ट्रातील सर्व विद्यार्थ्यांना आरोग्य विमा संरक्षण देण्यात यावे. विद्यार्थ्याचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण ते शिकत असलेल्या शाळा/महाविद्यालयातच करून घेण्याची यंत्रणा सरकारने लावावी. या सर्व मागण्या विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित असल्याने आम्ही या सर्व महत्त्वपूर्ण मागण्यांसाठी आग्रही आहोत आणि राज्य सरकारने या मागण्या पूर्ण न केल्यास भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने राज्यभर तीव्र आंदोलने करण्यात येतील. याप्रसंगी प्रदेश महामंत्री सुशील मेंगडे, महामंत्री राहुल लोणीकर, उपाध्यक्ष अनुप मोरे, उपाध्यक्ष राजेंद्र साबळे, उपाध्यक्ष योगेश माईंद, सदस्य सुनील राणा आदी मान्यवर उपस्थित होते.

# पनवेलमधील फार्मासिस्टची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोव्हीडमुळे काही दुकानदार वस्तू घरपोच आणून देत असल्याची संधी साधून एका ठकसेनाने पनवेल मधील एका फार्मासिस्टला औषधे आणि काही वस्तू खोट्या पत्यावर आणण्यास सांगून त्याच्याजवळ असलेली ५१५० रोख रक्कम घेऊन पलायन केल्याची घटना घडली आहे. या ठकसेनाविरोधात खांदेश्वर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

सदर प्रकरणातील तक्रारदार तरुण शुभम पाटील (२१) विचुंबे येथे राहण्यास असून तो पनवेल रेल्वे स्टेशन समोरील जेनरिक मेडीको या दुकानात फार्मासिस्ट म्हणून कामाला आहे. सध्या कोव्हीड-१९ साथरोग चालू असल्याने फोनवरुन औषधे मागविणाऱ्यांना या मेडीकल दुकानातून घरपोच औषधे पोहोचविण्यात येतात. याचाच फायदा उचलत एका ठकसेनाने डॉ.लिना मोरे बोलत असल्याचे भासवून या मेडीकलच्या मोबाईलवर संपर्क साधला होता. त्यानंतर सदर महिलेने २८५१ रुपयांच्या वस्तू मागवून तिच्याकडे दोन हजाराच्या नोटा असल्याचे फार्मासिस्टला सांगितले. तसेच येताना आणखीन ४ हजार रुपयांचे सुट्टे पैसे घेऊन येण्यास सांगितले. त्यानुसार शुभम पाटील सदर महिलेने मागविलेल्या वस्तू आणि दुकानाच्या गल्ल्यातील ५१५० रुपये घेऊन तिच्याकडून ८ हजार रुपये आणण्यासाठी साई प्लाझा इमारतीत गेला. त्यानंतर शुभम पाटील याने डॉ. लिना मोरे या महिलेला संपर्क साधून त्यांच्या फ्लॅट नंबरची विचारणा केल्यानंतर महिलेने ए विंग मध्ये ३०१ रुम नंबर असल्याचे आणि त्यांचे पती पार्किंगमध्ये असल्याचे सांगून त्यांच्याकडे वस्तू आणि रक्कम देण्यास सांगितले.

याचदरम्यान ए विंगमधून आलेल्या ठकसेनाने रुम न.१०१ जवळ शुभमला नेऊन त्याच्याकडून ५१५० रुपये घेतले. त्यानंतर त्याने डॉ. लिना मोरे ३०१ मध्ये राहण्यास असून त्यांना वस्तू देऊन येण्यास सांगितले. त्यानुसार शुभम ३०१ रुममध्ये वस्तू देण्यास गेला असता, त्याठिकाणी डॉ.लिना मोरे ऐवजी दुसरीच महिला राहत असल्याचे त्याला समजले. त्यामुळे तो पुन्हा रुम नं.१०१ मध्ये आला असता त्याठिकाणी त्याच्याकडून पैसे घेणारा व्यक्ती नसल्याचे त्याच्या लक्षात आले. त्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे शुभमच्या लक्षात आल्यानंतर त्याने खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# काळुंद्रे कातकरीवाडी तसेच आयटीआय रिक्षा स्टॅन्ड येथे रेशन किट वाटप



**दै.रायगड नगरी । पनवेल**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि भारतीय जनता पक्ष पनवेलतर्फे पनवेल तालुका व महानगरपालिका क्षेत्रा-तील गरीब, गरजू नागरिकांना सामाजिक बांधिलकीतून जीवनावश्यक वस्तूंचे वाटप कार्यक्रम सुरु आहेत.

त्या अनुषंगाने काळुंद्रे कातकरीवाडी तसेच आयटीआय रिक्षा स्टॅन्ड येथे नगर-सेवक अजय बहिरा, भाजप गाव अध्यक्ष बाळाराम चिखलेकर, युवा अध्यक्ष विशाल म्हस्कर, सचिन चिखलेकर, वसंत घरत, संजय चिखलेकर, विनोद परदेशी, डि. एस. घरत, अनंत पाटील, कुणाल म्हात्रे, गौतम गायकवाड, मंगेश गायकवाड यांच्या हस्ते रेशन किटचे वाटप झाले.

# कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या वाढदिवसानिमित्त माथेरानच्या कुशल कामगारांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**दै.रायगड नगरी । माथेरान**

कोरोनाच्या लॉकडावून मुळे माथेरानच्या जनते पुढे मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. यात सुतारकाम, गवंडीकाम, वेल्डिंग अश्या कुशल कामगारांना वर्षे भरात अवघा १५० दिवसांचे काम मिळत असल्याचे कुशल कामगार संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत सुतार यांनी सांगितले. सध्याच्या परिस्थितीत जगणे कठीण झाल्याचे प्रदीप शिंदे यांनी सांगितले.



रायगड इंटकचे अध्यक्ष किरीट पाटील यांना कामगारांची परिस्थितीची माहिती मिळताच कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत आज कुशल कामगारांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. माथेरान शहर कॉंग्रेस चे अध्यक्ष मनोज खेडकर यांनी माथेरान कुशल कामगार संघटनेला इंटक सोबत काम करण्याचे आवाहन केले रायगड जिल्हा इंटक चे अध्यक्ष किरीट पाटील यांनी कामगारांच्या भविष्याच्या विविध योजनांची माहिती दिली व इंटक संघटना पूर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन दिले. सदर प्रसंगी इंटकचे पदाधिकारी वैभव पाटील, संजय ठाकूर, आनंद ठाकूर, विवेक म्हात्रे, भाजप अध्यक्ष विलास पाटील, धनगर समाज अध्यक्ष राकेश कोकळे,युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष आदित्य भिलारे, ज्येष्ठ नेते भास्कर शिंदे, पपु खान, आदी उपस्थित होते कार्यक्रमा चे सूत्रसंचालन सुनिल शिंदे यांनी केले.

# पोलीसांचे संकल्पनेतून माणगांवात फ्रंटलाईन वर्करसाठी मोफत कोव्हिड अॅण्टीजेन चाचणी

## १०५ जणांची चाचणी निगेटिव्ह आली ही सकारात्मक (पॉझिटिव्ह) बाब

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव पोलीस, व्यापारी असोसिएशन व आरोग्य विभाग संयुक्त विद्यमाने, कोव्हिड १९ महामारीचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी फ्रंटलाईन वर्कर साठी मोफत अँण्टीजेन चाचणी मोहीम माणगांव जुनी पंचायत समिती कार्यालय येथे गुरुवार दिनांक ३ जुन रोजी सकाळी दहाचे सुमारास राबविण्यात आली. याप्रसंगी आरोग्य विभागाचे कर्मचारी, आरोग्य सेविका यांनी फ्रंटलाईन वर्करचे स्वाब घेत अँण्टिजन टेस्ट घेतली. याप्रसंगी माणगांवचे उपविभागीय पो-लीस अधिकारी प्रविण पाटील, वरिष्ठ पोलीस निरिक्षक अश्वनाथ खेडकर, पोलीस कॉंस्टेबल रामनाथ डोईफोडे, श्रेयस म्हात्रे तसेच व्यापारी असोशिएशनचे सदस्य उपस्थित होते.



या वेळी उपस्थित पोलीस निरिक्षक खेडकर यांचेशी पत्रकारांनी संवाद साधला असता रायगड जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक अशोक दुधे यांच्या संकल्पनेतुन व आदेशाने तसेच पोलीस उपविभागीय अधिकारी प्रविण पाटील यांचे मार्गदर्शनात व्यापारी वर्ग आणि त्यांचे कडील कामगार तसेच फळ-भाजी विक्रेते अशा अत्यावश्यक सेवेतील फ्रंट लाईन वर्करची मोफत कोव्हिड १९ चाचणी करुन कोरोना साथीचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी मोहीम राबविण्यात आली आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे. या मोहीमेत दुपार पर्यंत एकुण १०५ फ्रंटलाईन वर्करची चाचणी करण्यात आली त्यात एकही जन पॉझिटिव्ह आढळला नाही. सर्व रिझल्ट निगेटिव्ह ही सकारात्मक (पॉझिटिव्ह) बाब आहे.

तसेच माणगांवकरांनी काटेकोरपणे कोरोना प्रतिबंधक नियमावलीचे पालन करावे. बाजारपेठेत गर्दी करु नये तसेच विनाकारण कोणीही भटकताना आढळल्यास त्यावर सक्त कारवाई केली जाईल. असे त्यांनी या निमीत्ताने सांगितले आहे. अनेक फ्रंटलाईन वर्करनी आपली तपासणी करुन घेतल्याने कोरोनाचा प्रादूर्भाव रोखण्यास त्याचा नक्कीच लाभ होणार आहे.

# मुरुड तालुका भारतीय जनता पार्टी तर्फे ओबीसी समाजाचे हक्काचे आरक्षण परत मिळवून देणेबाबत मुख्यमंत्र्यांना निवेदन

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड तालुका भारतीय जनता पार्टी तर्फे ओबीसी समाजाचे हक्काचे आरक्षण त्यांना परत मिळवून देण्याबाबत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना मुरुडचे नायब तहसीलदार रवींद्र सानप यांच्याकडे भाजपचे दक्षिण रायगड सरचिटणीस मिलिंद पाटील यांच्या हस्ते देण्यात आले.



त्यावेळी तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, तालुका संघटन सरचिटणीस प्रवीण बैकर , सरचिटणीस नरेश वारगे , मुरुड शहर अध्यक्ष उमेश माळी , तालुका उपाध्यक्ष्य नरेश म्हात्रे ,शहर उपाध्यक्ष विनोद भगत, संदीप घरत , सुधीर पाटील, गणेश कट इत्यादी उपस्थित होते , निवेदनामध्ये काही दिवसांपूर्वी माननीय सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी समाजाला असलेले राजकीय आरक्षण , या संदर्भातील सरकारची पुनर्विचार याचिका फेटाळली परंतु यावर मुख्यमंत्री यांनी कोणतीच प्रतिक्रिया दिली नसल्याचे नमूद केले आहे. तसेच दिनांक १२ डिसेंबर २०१९ या दिवशी सर्वोच्च न्यायालयाने लवकरात लवकर राज्य मागासवर्गीय आयोगाचे गठन करावे, राज्यातील ओबीसी समाजाचा इम्पिरिकल डेटा जमा करून तो तात्काळ न्यायालयात सादर करावा या आदेशाला जवळपास पंधरा महिने झाले तरी त्यावर कोणतीही कार्यवाही केलेली नाही. तसेच १२ डिसेंबर नंतर न्यायालयांनी दिलेल्या दहा ते बारा तारखांना सरकार आदेशांची पूर्तता करून न्यायालयात हजर राहिले नसल्याचा उल्लेख केला आहे. भाजपचे दक्षिण रायगड सरचिटणीस मिलिंद पाटील यांनी सांगितले की आमचे नेते व विधानसभेचे विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांनी पंधरा महिन्यात पाच ते सात वेळा पत्राद्वारे उच्च न्यायालयाच्या आदेशाचे गांभीर्य लक्षात आणून देण्याचा प्रयत्न केला तसेच भाजप ओबीसी मोर्चाच्या वतीने अनेक वेळा पत्रव्यवहार केला परंतु त्यावर अजून काहीही कार्यवाही झालेली नाही तसेच मुरुड तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर यांनी ओबीसी समाजाला त्यांच्या हक्काचे आरक्षण मिळत नाही तोवर आम्ही शांत बसणार नाही व यावर लवकरात लवकर कार्यवाही झाली नाही तर भाजप ओबीसी मोर्चा कडे आंदोलनाशिवाय दुसरा पर्याय उरणार नसल्याचे सांगितले.

# विनाकारण विनामास्क फिरणाऱ्यांवर कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावावर पनवेल तालुका पोलिसांनी विनाकारण विनामास्क फिरणाऱ्यांवर कारवाई केली आहे.

पनवेल जवळील नेरे चौकी या परिसरात अॅमेझ होंडा या गाडीतून फिरणारे राजेंद्र चव्हाण, सुभाष चव्हाण, हनुमान गायकर यांच्याविरुद्ध कोव्हीड १९ या रोगाचा प्रादुर्भाव असल्याचे माहित असून देखील विनाकारण विनामास्क कोरोना या विषाणूचा संसर्ग होवून साथ पसरण्याची शक्यता असताना सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतीही उपाय योजना न करता शासनाचे संचारबंदीचे आदेश असताना देखील विनाकारण सार्वजनिक ठिकाणी विनामास्क चारचाकी वाहनात प्रमाणापेक्षा जास्त प्रवासी फिरत असल्याचे आढळल्याने त्यांच्या विरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.


**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग, यांचे कार्यालय**
**शुक्रतारा बिल्डींग, तळमजला सतकार प्रेस समोर, पो.ता.अलिबाग, जि.रायगड**
**दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ईमेल-**ddr_rgd@rediffmail.com

**(महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री व्यवस्थापन हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ याच्या कलम ११ पोटकलम (३) अन्वये अर्जदारांच्या नावे एकतर्फी मानवी अभिहस्तांतरण)**

**महालक्ष्मीनगर गुलमोहर सहकारी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या.नेरे गाव विभाग ३, ता.पनवेल, [.जिरायगड**

**मालमत्तेचे मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयंस बाबत) जाहीर नोटीस**

महालक्ष्मीनगर डेव्हलपर्स तर्फे १/१, श्री.अनिश मेहता, कार्या. पत्ता ११२, मेकर चेंबर ३२२३ नरिमन पॉईंट, मुंबई यांना जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे कार्यालयात महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियम ११ अन्वये खालील मालमत्तेचे मानिव अभिहस्तांतरण करून मिळणेबाबत अर्ज केला आहे. सर्व संबंधितांना आपले म्हणणे सादर करणेसाठी संधी मिळावी म्हणून दि.१६/०६/२०२१ रोजी स.११.३० वाजता अंतिम सुनावणी निश्चित केली आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
**सर्व्हे नं.२३८/२, (नवीन सर्व्हे नं.९२/२) क्षेत्र २०७० चौ.मीटर, २३४, क्षेत्र ३७४० चौ.मीटर, (नवीन सर्व्हे नं.८८) सर्व्हे नं.२/१, क्षेत्रफळ २४३० चौ.मीटर, (नवीन सर्व्हे नं.८७/१)**
**एकूण क्षेत्रफळ ८२४० चौ.मीटर, मौजे नेरे, ता.पनवेल, जि.रायगड**

वरील मिळकतीबाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावित कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दि.१६/०६/२०२१ पूर्वी या कार्यालयात दाखल करावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस हजर रहावे अन्यथा कोणाचीही काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.०२/०६/२०२१

**सही/-**
**(गोपाळ मावळे)**
**सक्षम प्राधिकारी,**
**तथाा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था रायगड-अलिबाग**

# संक्षिप्त...

## शहापूर ग्रामपंचायतीमध्ये स्वयंसहाय्यता समूहातील महिलांचे आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत अलिबाग तालुक्यातील शहापूर ग्रामपंचायत आरोग्य उपकेंद्रामध्ये अलिबाग गटविकास अधिकारी सौ. दीप्ती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महिला महासमृद्धी अभियान अंतर्गत स्वयंसहाय्यता समूहातील महिलांसाठी काल (दि. ०२ जून) रोजी आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबीरात उपस्थित महिलांची ऑक्सिजन लेवल, रक्तदाब आणि अँटीजेन तपासणी करण्यात आली. यावेळी ग्रामपंचायत सरपंच महेंद्र पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या शिबिराकरिता ग्रामपंचायत शहापूर सरपंच महेंद्र कृष्णा पाटील, आरोग्य उपकेंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. श्वेता युगेश पाटील, आरोग्य सेविका समिधा संतोष खोत, आरोग्य सेवक के. एस. झेमसे तसेच आशा सेविका, सीआरपी विजया सतीश भगत, ग्रामसंघ अध्यक्ष मंदा नंदकुमार पाटील आणि प्रभाग समन्वयक साईनाथ पाटील उपस्थित होते.

## अंकुर ट्रस्ट मार्फत दुर्गम भागातील रुग्णावर उपचार

**दै.रायगड नगरी । पेण**

सर्वत्र करोनाच्या प्रादुर्भाव असताना ईतर सर्व सामान्य रुग्णांवर अंकुर ट्रस्ट व मैत्रेय राज फाऊंडेशन यांच्या मार्फत सुरू करण्यात आलेल्या फिरत्या दवाखान्या मार्फत मोफत उपचार करण्यात आले. या फिरत्या दवाखान्या मार्फत पेण तालुक्यातील अनेक दुर्गम वाड्यावर डॉक्टर ,सामाजिक कार्यकर्ते व स्वयंसेवक यांच्या चमूने दुर्गम भागातील आदिवासी वाड्यावर भेटी दिल्या असता या भेटी मध्ये नेत्र चिकित्सक डॉ. आशुतोष मढवी यांनी अनेक आदिवासी वृद्धा वर उपचार केले. यामधे डोळ्यातून पाणी गळणे , अंधुक दिसणे किंवा डोळे लाल होणे या सारख्या अनेक तक्रारी असलेल्या रुग्णांनी मोफत तपासणी करून घेतली. तसेच या वेळी डॉ. मैत्रेयी पाटील यांनी सर्दी – खोकला , ताप या सारखे लक्षणे असलेले परंतु रुग्णालयात न जाऊ शकणारे अश्याना मोफत तपासणी करून औषधे ही वाटप केली. सभोवताली कोविड ची लागण, रोजगाराची उपलब्ता नाही यामुळे हतबल झालेल्या ग्रामीण रुग्णांना स्वयंसेवी संस्थेच्या पुढाकाराने सुरू करण्यात आलेला या फिरत्या दवाखान्याचा आधार वाटू लागला आहे. या उपक्रमात राम यादव, अंकुर ट्रस्ट च्या सुवर्णा पाटील,गार्गी पाटील, चाईल्ड हेवन चे प्रकाश पाटील, संदीप दोषी यांनी स्वयंसेवक म्हणुन काम केले.असल्याचे अंकुर ट्रस्टच्या अध्यक्षा वैशाली पाटील यांनी सांगितले.

# पेणच्या बाप्पांची परदेश वारी ; हजारो गणेश मूर्ती विदेशात रवाना

**दै.रायगड नगरी । पेण**

संपूर्ण जगात पेणच्या गणेशमूर्तिंची ख्याती आहे. त्यामुळेच देश विदेशात गणेशमूर्तीना मागणी असते. मागील वर्षी प्रमाणे यंदाही कोरोनाचे संकट असतानाही विन्घहर्ता श्री गणेशाची परदेशवारी अर्थात सातासमुद्रापारचा प्रवास सुरू झाला आहे. पेण तालुक्याच्या काही गणेशमूर्ती शाळांतुन एकत्रित अशा शाडू मातीच्या व प्लास्टर ऑफ पॅरिसच्या हजारो गणेशमूर्ती अमेरिका, थायलंड आदी देशांमध्ये रवाना झाल्याची माहिती पेण येथील मूर्तिकार दीपक समेळ यांनी दिली.



बाप्पांच्या परदेशवारीस अखेर सरकारची मान्यता मिळाल्याने व परदेशातील अनिवासी भारतीयांनी ऑनलाईन नोंदणी केलेल्या ऑर्डरनुसार पेण तालुक्यामधील कार्यशाळांनी मागणी तसा पुरवठा या तत्त्वानुसार गणेश मूर्ती पाठविण्यात आल्याचे कार्यशाळा मालकांनी माहिती देताना सांगितले. २०२१ या वर्षातील गणेशोत्सवाला १० सप्टेंबर रोजी प्रारंभ होत असल्याने मान्सूनच्या आगमनाची चाहूल लागताच ही ऑर्डर उशिरा का होईना परंतु जात असल्याने मूर्तीकारांनी समाधान व्यक्त केले आहे.

गतवर्षी कोरोनाच्या पहिल्या लाटेत बाप्पांच्या परदेशवारीत खंड पडून गणेश मूर्तींची परदेश वारी न झाल्याने मूर्तीकारांना मोठा आर्थिक फटका बसला होता. यावर्षीही पुन्हा एकदा कोरोना महामारीची दुसरी लाट सुरू झाल्याने एप्रिल महिन्यात मागणी केलेल्या गणेशमूर्तींची ऑर्डर अखेर मे महिन्याच्या अखेरीस जाण्यासाठी परवानगी मिळाल्याने पेणच्या मूर्तीकला विश्वात आनंद व्यक्त केला जात आहे. साधारणपणे अर्धाफूट उंचीपासून पाच फूट उंचीच्या मूर्ती थायलंड, अमेरिका, लंडन, मॉरिशस या देशांत सप्टेंबर महिन्याच्या प्रारंभी समुद्रमार्गे पोहोचतील.४० फूट लांब कंटेनरमध्ये साधारण १४०० ते १५०० लहान मूर्ती सामावतात. तर दोन व पाच फूट उंचीच्या ४०० ते ५०० बॉक्स कंटेनरमध्ये असून, अशा सतरा कंटेनरममधून हजारो गणेशमूर्तीनी परदेश गमनासाठी प्रस्थान केले आहे. यंदाच्या गणेशोत्सवाला १० सप्टेंबर रोजी प्रारंभ होत असल्याने मान्सूनच्या आगमनाची चाहूल लागताच ही ऑर्डर आणि सरकार कडून परवानगी मिळाल्याने मूर्तीकारांनी समाधान व्यक्त केले आहे.

पेण तालुक्यामधील काही मोठ्या गणेशमूर्ती व्यावसाईकांचे बाप्पा परदेशवारी करीत असले तरी मात्र पेणमधील छोटे व्यावसायिक मात्र अजूनही ग्राहकांच्या प्रतीक्षेत असल्याचे चित्र काही मूर्ती शाळांमध्ये दिसत आहे. तर पीअ–ोपी बंदीमुळे बाप्पाच्या मूर्ती घडविण्यात मोठा अडथळा येत असल्याचीही खंत कारखानदारांनी व्यक्त केली आहे. कोरोना लॉकडाउनचा फटका गणेश मूर्ती तयार करणाऱ्या छोट्या मूर्तीकार व सर्व कारागिरांना बसला आहे. दरवर्षी मार्च/एप्रिल महिना लागताच गणेश भक्तांकडून बाप्पाच्या मूर्तीची बुकिंग व्हायला सुरूवात होते. मात्र यंदा आतापर्यंत हातावर मोजन्या इतक्याच घरगुती गणपतींचे बुकिंग झाली आहे. तर सार्वजनिक मूर्ती मंडळाकडून बुकिंग केले नसल्याने त्या मूर्तिकारांचे लक्ष छोट्या–मोठ्या मंडलांकडे लागले आहे.

मागील वर्षी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी चार फुटी उंचीच्या गणेश मूर्तींची प्रतिष्ठापना करावी अशी सूचना महाराष्ट्र राज्य सरकारने केली होती. त्यामुळे आधीच मोठ्या गणेश मूर्ती तयार करून बसलेल्या मूर्तिकारांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले होते. कोरणाची दुसरी लाट अजूनही ओसरली नसून तिसरी लाट येत्या ऑगस्ट–सप्टेंबर महिन्यात येण्याची दात शक्यता असल्याचे तज्ञांचे मत आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने गणेश मूर्तींच्या उंचीबाबत आताच नियमावली जाहीर करावी अन्यथा मागील वर्षीप्रमाणे यंदाही मूर्तिकारांना पुन्हा एकदा मोठ्या आर्थिक नुकसानीला तोंड द्यावे लागेल असे येथील मूर्तिकार वैभव धुमाळ आणि संदेश घरत यांनी सांगितले.

मागील वर्षी पेणमधील जवळपास ७० ते ८० टक्के मूर्तिकारांना लाखो रुपयांचा फटका बसला होता. आजही त्या जास्त फुटीच्या मूर्ती कारखान्यात पडून आहेत. तर काहींनी त्या स्वतःहून समुद्रामध्ये विसर्जन केल्या आहेत. मोठे आर्थिक नुकसान आणि गणेशमूर्ति व्यावसाईक आणि कारखानदार याच्यातील संभ्रम टाळण्यासाठी राज्य शासनाने मूर्तिकारांचा विचार करून गणेश उत्सव सणाबाबत जी काही नियमावली असेल ती लवकरात लवकर जाहीर करावी अशी मागणी येथील मूर्तीकारांकडून करण्यात आली आहे.

# म्हसळा शहरात विनाकारण फिरणाऱ्यांची कोरोना चाचणी

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

एकीकडे राज्य शासनाने नियम घालून दिले असताना, शिवाय संचारबंदी लागू असताना देखील २ नंतर म्हसळा शहरात विनाकारण नसताना अनेकजण बाहेर फिरत असतात. या पार्श्वभूमीवर म्हसळा तालुक्यातील म्हसळा शहरात दुपारच्या आणि संध्याकाळच्या वेळी रस्त्यावरून विनाकारण फिरणाऱ्यांची कोरोना टेस्ट म्हसळा पोलीस प्रशासनामार्फत करण्यास सुरुवात केली असल्याचे दिसण्यात येत आहे.



कोरोनाच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर राज्यात गेल्या महिनाभरापासून कडक निर्बंध लागू करण्यात आले असताना देखील, त्या निर्बंधाना नागरिक जुमानत नसल्याचे चित्र दिसण्यात येत आहेत. ह्या नियमांना न जुमानता नागरिक सर्रासपणे रस्त्यावर फिरताना अनेक ठिकाणी पहावयास मिळत आहेत. त्यामुळे जे नागरिक रस्त्यावर विनाकारण फिरत असतील अश्यांची त्याच ठिकाणी रस्त्यावर अँटीजन टेस्ट करण्यास म्हसळा पोलीस प्रशासना मार्फत करण्यात आली आहे. म्हसळा पोलीस निरीक्षक उद्धव सुर्वे, पी.एस.आय. सूर्यवंशी, म्हसळा पोलीस स्टेशन कर्मचारी वर्ग व आरोग्य विभाग यांनी चांगली कामगिरी केल्याबद्दल म्हसळा तालुक्यात त्यांचे कौतुक केले जात आहे.

## वाडगाव ग्रामपंचायतीमध्ये महिला बचतगटातील महिलांचे आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महासमृद्धी महिला सशक्तीकरण योजनेंतर्गत आज (दि.३ जून) रोजी अलिबाग तालुक्यातील वाडगाव ग्रामपंचायतीमध्ये महिला बचतगटातील महिलांचे HB, BP, ऑक्सिजन, व अँटीजन टेस्ट अशा विविध प्रकारचे आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिराच्या माध्यमातून सुमारे ३७ महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी गटाविकास अधिकारी सौ. दिप्ती पाटील, सहायक गटविकास अधिकारी श्री.चौलकर, श्री. मंगेश पाटील, आरोग्य विस्तार अधिकारी, वाडगाव ग्रामपंचायत सरपंच, ग्रामसेविका, आरोग्य केंद्रातील डॉक्टर, स्टाफ सीआरपी ताई आणि प्रभाग समन्वयक अमोल माळी उपस्थित होते.

# कर्जत रेल्वे पोलीस वर्दीतील देवदुतांमुळे एक महिलेचे वाचले प्राण

**दै.रायगड नगरी । कर्जत**

रेल्वेच्या मेन लाईन वरील कर्जत–लोणावळा मार्गावर दरम्यान रेल्वे ट्रॅक जवळ निपचित पडलेल्या महिलेला रेल्वे पोलिसांनी कापडी झोळीच्या साह्याने ५ किलोमीटरचे अंतर पायी केले. त्यानंतर कर्जत उपजिल्हा रुग्णालयात वेळेत हजार केल्याने तिचा प्राण वाचवला. या कामगिरीमुळे कर्जत रेल्वे पोलीसांचे सर्व स्थरातून कौतूक होत आहे.



आशा वाघमारे या कार्ला–इरगाव येथील राहणारी असून त्या कर्जत ते लोणावळा दरम्यान एक महिला रेल्वे ट्रॅकच्या खाली जखमी अवस्थेत पडल्या होती. सोमवारी कर्जत रेल्वे स्थानकात ड्युटीवर असलेल्या रेल्वे पोलिसांना देण्यात आली होती. कर्जत रेल्वे पोलीस कर्मचार्यांयचे सहा जणांचे एक पथक घटनास्थळी रवाना होण्यासाठी पळसधरी रेल्वे स्थानकात हजर झाले होते. तेथून ५ कि.मी अंतरावर पुणे कडे घाटमाथ्यावर डोंगर दुर्गम भागात रेल्वे ट्रॅक चढले. त्यावेळी रेल्वे मार्गावर एक महिला बेशुद्धावस्थेत असल्याची दिसून आले. येथे जाण्याशिवाय त्यावेळी कोणताही मार्ग नसल्याने या पथकाने पांच किलोमीटर हे अंतर पायी पार केल्यानंतर रेल्वे ट्रॅक जवळ ही महिला आढळून आली होती.

तिच्या पायाला आणि कंबरेला मार लागला असल्याने ती पाणी मागत होती. जंगल सदृश भाग असल्याने येथे पाण्याची सोय नसल्याने पथकातील एका पोलिसाने गावात जाऊन पाणी आणले होते. परंतु या महिलेला जबर मार असल्याने तिची हालचाल होत नव्हती, तिला खांद्यावर उचलून नेल्याशिवाय पर्याय नव्हता. या पथकाने जवळ असलेल्या चादरीची झोळी करून खांद्यावर पुन्हा पांच किलोमीटर जंगल पायपीट करत खोपोली केलवली येथे रस्त्याजवल आणले आणि तेथून रुग्णवाहिकेतून कर्जत उपजिल्हा रुग्णालय गाठले.

अखेर या महिलेला पोलिसांच्या या खडतर प्रवासा नंतर वेळेत उपचार मिळाल्याने महिलेचे प्राण वाचले आहे. कौतुकास्पद कामगिरी करणार्याळ या पथकामध्ये पोलीस उपनिरीक्षक टी. एन .सरकाळे, पोलीस शिपाई निकेश अनंता तुरडे, पोलीस शिपाई मंगेश गायकवाड, पोलीस नाईक ज्ञानेश्वर खंडू गांगुर्डे, तसेच आरपीएफ जवान कोडींराम बनसोडे आणि होमगार्ड व्ही. डी. लोभी यांचे कौतूक होत आहे.

# सारडे येथील कोमनादेवी ऑक्सिजन पार्कमध्ये बसण्याची आसन व्यवस्था

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील निसर्गरम्य परिसर असलेल्या सारडे येथील कोमनादेवी ऑक्सिजन पार्कचा चेहरामोहरा बदलून निसर्गरम्य असे पर्यटनस्थळ बनण्याच्या दिशेने आगेकूच होत आहे. यासाठी त्यांना अनेक मदतीचे हात पुढे येत आहेत. निवास गावंड यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त कोमनादेवी ऑक्सिजन पार्कमध्ये बसण्यासाठी आसन व्यवस्था केली आहे.

वाढदिवसाच्या निमित कित्येक लोक पार्टी आणि मौजमजा करून धन्यता मानतात. मात्र हा वाढदिवस मात्र जरा वेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. अल्पशा मानधनावर काम करणारा हा शिक्षक परंतु समाज्यासाठी आपल्या परीनं जे काही करता येईल ते प्रामाणिक करण्याचा प्रयत्न करीत आहे. या अगोदर विविध उपक्रम दत्तक पालक योजना असेल किंवा आदिवासी वाडीवरील गरीब, गरजू विद्यार्थ्यांना कपडे वाटप असे उपक्रम राबविले जात आहेत. याही वर्षी कोमनादेवी ऑक्सिजन पार्कमध्ये बसण्याची आसन व्यवस्था व्हावी असा संकल्प त्यांनी केला. तो पूर्ण करून सुंदर बेंच कोमनादेवी ऑक्सिजन पार्कमध्ये बसविण्यात आला. यासाठी सारडे विकास मंचचे रोहित पाटील, विलास पाटील सर, प्रसाद पाटील, नितीन म्हात्रे, कांतीलाल म्हात्रे, निलेश म्हात्रे, प्रतीश म्हात्रे, नितेश पाटील, वैभव पाटील, अमर पाटील, रचित यांचे मोलाचं सहकार्य लाभले.



## पत्रकारांना लसीकरणामध्ये प्राधान्यक्रम द्यावा : सतीश पाटील

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

कोरोना काळात आपला जीव धोक्यात घालून लोकशाहीच्या चौथ्या स्तभाची शान राखून उत्तंम प्रकारचे काम करून शासनाची विविध स्तरावरील माहिती जनतेपर्यंत सक्षमरीत्या पोचवून समाजसेवेचे व जनजागृतीचे काम करणाऱ्या पनवेल सहित संपूर्ण जिल्ह्यातील पत्रकारांचे व त्यांच्या कुटुंबीयांचे लसीकरण करताना प्राधान्य देण्यात यावे अशी मागणी पनवेल महापालिकेतील राष्ट्रवादीचे नगरसेवक सतीश मोहन पाटील यांनी लेखी पत्राने आयुक्तांकडे केली आहे.



गेल्या मार्च महिन्यापासून पनवेल महानगरपालिका क्षेत्रात लसीकरण सुरू आहे. एक लाखापेक्षा जास्त नागरिकांनी कोरोना प्रतिबंधात्मक लस घेतली आहे. मनपा प्रशासनाने केलेल्या या व्यवस्थेबाबत प्रशासकीय प्रमुख म्हणून प्रशासनाचे जाहीरपणे आभार मानले जात आहेत. परंतु हे करीत असताना पनवेल परिसरातील पत्रकारांना लसीकरणा मध्ये प्राधान्यक्रम देण्यात येत नाही. ही बाब खेदजनक आणि चिंता व्यक्त करणारी आहे. पनवेल चे पत्रकार आपला जीव धोक्यात घालून सर्वसामान्यांपर्यंत बातम्या पोचवण्याचे माध्यम म्हणून महत्वाचे काम करीत आहेत. महानगरपालिकेच्या वेगवेगळ्या सूचना आणि प्रेस नोटची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचे काम पत्रकारांकडून केले जाते. हे सर्व बांधव सर्वसामान्य कुटुंबातील आहेत. त्यांच्यावर त्यांच्या परिवाराची जबाबदारी आहे. या सर्व अनुषंगाने पनवेल च्या सर्व पत्रकार बांधवांना व त्यांच्या कुटुंबियांना फ्रंन्टलाइन वर काम करणारे म्हणून त्यांना त्वरित कोरोना लस देण्याची व्यवस्था करण्यात यावी अशी न्याय्य मागणी पनवेल महापालिकेतील कार्यतत्पर नगरसेवक सतिश मोहन पाटील यांनी एका लेखी पत्रान्वये पनवेल महापालिकेचे आयुक्त सुधाकर देशमुख यांच्याकडे केली आहे.

### राज्यातील विविध उद्योग, आस्थापनांमध्ये...

## १ लाख युवकांना मिळणार अप्रेंटीसशीपची संधी प्रशिक्षणाबरोबरच रोजगारही मिळणार : नवाब मलिक

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेली वाढती बेरोजगारी कमी करण्यासाठी राज्यातील युवकांना रोजगार आणि प्रशिक्षण उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना (Maharashtra Apprenticeship Promotion Scheme - MAPS) राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याअंतर्गत चालू वर्षात राज्यातील विविध उद्योग, आस्थापना यामध्ये १ लाख युवकांना प्रेंटीसशीपची संधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. पुढील पाच वर्षात ५ लाख सुशिक्षित बेरोजगार तरुणांना या योजनेतून रोजगार आणि प्रशिक्षण उपलब्ध करुन देण्याचे उद्दीष्ट आहे, अशी माहिती कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मंत्री नवाब मलिक यांनी दिली. या योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांना देय विद्यावेतनाच्या ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त ५ हजार रुपये यापैकी कमी असलेले विद्यावेतन अनुज्ञेय राहील, अशी माहितीही त्यांनी दिली.



या योजनेसंदर्भातील शासन निर्णय आज निर्गमित करण्यात आला आहे. औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांना उपयोगी पडतील अशा ७१५ व्यवसायांना ही योजना लागू केली आहे, असे त्यांनी सांगितले.

मंत्री श्री. मलिक म्हणाले की, कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावामुळे सद्यस्थितीत बेरोजगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. अशा परिस्थितीत राज्यातील युवक–युवतींना रोजगारक्षम करुन प्रत्येक हाताला काम देणे हे शासनाचे ध्येय आहे. राज्यातील किमान दहावी उत्तीर्ण झालेल्या युवक–युवतींना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी व अनुभव उपलब्ध करुन देण्यासाठी नवीन महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना कार्यान्वित करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत शिकाऊ उमेदवार भरतीसाठी आस्थापनांना प्रोत्साहित करुन पाच वर्षात ५ लाख सुशिक्षित बेरोजगार तरुण प्रशिक्षित होतील. त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधीही प्राप्त होतील.

उद्योगांना आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ तयार करण्याबरोबरच राज्यातील युवक–युवतींना प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम बनविणे ही काळाची गरज आहे. शासकीय, निमशासकीय व खाजगी आस्थापनांमध्ये शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ मधील तरतुदीनुसार पारंपारिक व नवीन उद्योगक्षेत्रांमध्ये उमेदवारांना ठराविक कालावधीसाठी प्रशिक्षण देण्यात येईल. मुलभूत प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस (Basic Training Provider) प्रति प्रक्षिणार्थी प्रशिक्षण खर्च प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील. तसेच ज्या मुलभूत प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस केंद्र शासनाकडून प्रशिक्षण प्रतिपूर्ती मिळणार नाही अशा संस्थांना प्रशिक्षण खर्च रक्कम प्रतिपूर्ती प्रति प्रशिक्षणार्थी अनुज्ञेय राहील. यासंदर्भातील सविस्तर माहिती आज निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयात देण्यात आली आहे, असे मंत्री श्री. मलिक यांनी सांगितले.